# या गणराया

या गणराया उशीर झाला
सालभर काळ गुदरला
यंदा अधिक महीना आला
उत्कंठेत जीव अडकला

उद्या चतुर्थी संपे प्रतीक्षा
तयार आम्ही सारे स्वागता
वाजत गाजत यावे घरा
सुखे राहावे दिवस दहा

गणराया तुम्ही बुद्धिदाता
विघ्नच ना दुर्बुद्धी हरता
खाऊनी मोदक मोद देता
दहा दिसांनी का परतता

– नारायण
हरतालिका, शके १९४५
(०९/१९/२३)